पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.
मा.स्थायी समिती.
कार्यपत्रिका क्रमांक- १५६
सभावृत्तांत

दिनांक- २.३.२०१० वेळ- सकाळी ११.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची विशेष सभा मंगळवार, दिनांक २.३.२०१० रोजी सकाळी ११.०० वा. महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.जगदीश शंकर शेट्टी
२. मा.प्रशांत कृष्णराव शितोळे
३. मा.जितेंद्र बाबासाहेब ननावरे
४. मा.सुरदास तुकाराम गायकवाड
५. मा.आण्णा उर्फ मनोहर पवार
६. मा.सौ.सुलोचना बबन बढे
७. मा.सुमनताई मधुकर पवळे
८. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव
९. मा.थोरात एकनाथ दादा
१०. मा.प्रेमकुमार शंकरन नायर उर्फ बाबू नायर
११. मा.गावडे जयश्री वसंत

याशिवाय मा.चंद्रकांत दळवी- जिल्हाधिकारी, मा.आशिष शर्मा- आयुक्त, मा.डुंबरे - अति.आयुक्त,मा.देशमुख- सहा.आयुक्त, मा.काळे- नगरसचिव, मा.सुर्यवंशी- कायदा सल्लागार, मा.गायकवाड- जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

-----------

मा. जिल्हाधिकारी- (पिठासीन अधिकारी) सन्मा.सदस्य, सन्मा.आयुक्त, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करतो आजच्या विशेष सभेत स्थायी समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी सभेचा पिठासीन अधिकारी म्हणुन माझी याठिकाणी नेमणुक केलेली आहे मुक्त व निर्भयपणे स्थायी समितीच्या सभापती पदाची निवडणुक पारपाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवण्यात आलेली आहे.

मा.नगरसचिव - मा.स्थायी समितीचे सभापती पदावर मुं.प्रां.म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम २१ (१) नुसार, नेमणुक करणेकामी एकुण ४ नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत त्यामधील उमेदवार, त्यांचे सुचक व अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | प्रशांत कृष्णराव शितोळे | साळुंके राजेंद्र गुलाबराव | कुंभार रामदास तानाजी |
| २ | प्रशांत कृष्णराव शितोळे | गायकवाड सुरदास तुकाराम | सुमनताई मधुकर पवळे |
| ३ | प्रशांत कृष्णराव शितोळे | शेट्टी जगदीश शंकर | वाघेरे प्रभाकर नामदेव |
| ४ | प्रशांत कृष्णराव शितोळे | ननावरे जितेंद्र बाबासाहेब | सौ.आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी |

[मा.नगरसचिव यांनी त्यांना प्राप्त झालेली उपरोक्त एकूण ४ नामनिर्देशनपत्रे मा.पिठासीन अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली. मा.पिठासीन अधिकारी यांनी त्यांची छाननी केली.]

मा. पिठासीन अधिकारी- मा.स्थायी समितीचे सभापती पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या उपरोक्त एकुण ४ नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आली असुन ती सर्व नामनिर्देशन पत्रे वैध ठरलेली आहेत. त्यामध्ये मा.स्थायी समिती सभापती पदाची निवडणुक लढविणारे मा.प्रशांत कृष्णराव शितोळे हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

**ठराव क्रमांक- १०७५०** **विषय क्रमांक- १**

**दिनांक- २.३.२०१०**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समिती सभापती पदासाठी चार नामनिर्देशन पत्रे मुदतीत दाखल झालेली असुन वैध ठरलेली आहेत. त्यामध्ये मा.स्थायी समिती सभापती पदाची निवडणूक लढविणारे मा. प्रशांत कृष्णराव शितोळे हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने मा.प्रशांत कृष्णराव शितोळे यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थायी समितीचे सभापती पदावर रितसर वैधरित्या निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.**

**सही/-**
**( जिल्हाधिकारी )**
पिठासीन अधिकारी

---------

**यानंतर मा.पिठासीन अधिकारी यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.**

**सही/-**
**( जिल्हाधिकारी )**
पिठासीन अधिकारी
स्थायी समिती (विशेष) सभा

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका,**
**पिंपरी- ४११ ०१८.**
**नगरसचिव कार्यालय**
**क्रमांक- नस/४/कावि/३३४/२०१०**
**दिनांक- ०२/०३/२०१० चे लगत**

**सही/-**
**नगरसचिव**
**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**पिंपरी - ४११ ०१८**

**प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.**